
**दिनांक ०४.०६.२०२६ रोजी अकोला येथे व्यवस्थापकीय संचालक, महाबीज यांचे कार्यालयामध्ये बियाणासंबंधी बैठक व चर्चा**






दिनांक ११.०६.२०२६ रोजी प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था (PACS) अंतर्गत गोदामासंबंधी विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, अमरावती यांचे समवेत बैठक व चर्चा



दिनांक ११.०६.२०२६ शेतक-यांना CSR फंडातून पेरणी टोकन यंत्र व इतर शेतीपयोगी साहित्य वाटप करण्याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अधिकारी यांचे समवेत बैठक व चर्चा



**दिनांक १२.०६.२०२६ विश्रामभवन, बुलढाणा येथे निवासी उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी तसेच मृद व जलसंधारण विभागाचे अधिकारी यांचे समवेत नाला खोलीकरण व शासकीय जमीनीवर चारा लागवड करण्यासंबंधी बैठक व चर्चा**





दिनांक १२.०६.२०२६ तहसिल कार्यालय मोताळा, जि. बुलढाणा येथे तहसिलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी, पशुधन विकास अधिकारी यांच्या समवेत तालुक्यातील शेतकरी आत्महत्या व शासकीय जमिनीवर चारा लागवडसंबंधी बैठक व चर्चा






**दिनांक १२.०६.२०२६ मोताळा ते अंत्री रस्त्यावरील नाला खोलीकरणाचे ठिकाणास भेट व पाहणी**





दिनांक १२.०६.२०२६ अंत्री, ता. मोताळा, जि. बुलढाणा येथे आत्महत्याग्रस्त शेतकरी मृतक वसंत भिकु जवरे यांचे कुटूंबियास भेट





दिनांक १२.०६.२०२६ इसरखेड, ता. नांदूरा, जि. बुलढाणा येथे आत्महत्याग्रस्त शेतकरी मृतक गजानन किसन मुंढे यांचे कुटूंबियास भेट





दिव्य मराठी बुलडाणा 17-06-2026

# शेतकऱ्यांनी पूरक व्यवसाय स्वीकारणे गरजेचे

प्रतिनिधी | खामगाव

उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करून शेतकऱ्यांना स्वावलंबी बनविणे आवश्यक आहे. विदर्भातील शेतकऱ्यांनी केवळ कापूस आणि सोयाबीनवर अवलंबून न राहता दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन आणि रेशीम उद्योगासारख्या पूरक व्यवसाय स्वीकारणे काळाची गरज आहे असे प्रतिपादन कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) ॲड. नीलेश हेलोंडे पाटील यांनी व्यक्त केले.

ते, जिल्हा दौऱ्या दरम्यान मोताळा व नांदुरा तालुक्यातील विविध गावांना भेट देत शेतकरी, ग्रामस्थ आणि शासकीय अधिकाऱ्यांशी संवाद साधला. दरम्यान, शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतांना पुढे ते म्हणाले की, ग्रामपंचायतीच्या पडीक जमिनी, नदी-नाल्यांचे काठ आणि सार्वजनिक जागांचा उपयोग हिरवा चारा उत्पादनासाठी केल्यास पशुपालनाला मोठी चालना मिळू शकते. ग्रामीण भागातील सुशिक्षित युवकांनी नोकरीच्या प्रतीक्षेत न राहता स्वयंरोजगाराच्या संधींचा लाभ घ्यावा. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शासनाच्या सर्व योजनांचा लाभ प्राधान्याने मिळाला पाहिजे. त्यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने काम करावे, असे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

दौऱ्यात कृषी, ग्रामविकास, पशुसंवर्धन, महसूल तसेच महिला व बालविकास विभागांच्या अधिकाऱ्यांसोबत बैठका घेऊन विविध योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. दरम्यान, ॲड. हेलोंडे पाटील यांनी मोताळा तालुक्यातील पिंप्री गवळी (घोनखेड) तसेच नांदुरा तालुक्यातील इसरखेड येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना भेट दिली. कुटुंबीयांची विचारपूस करून त्यांचे सांत्वन केले. तसेच शासकीय योजनांमधून मदत उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. आत्महत्याग्रस्त कुटुंबांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळावा, यावर त्यांनी भर दिला. दौऱ्यादरम्यान जलसंधारण विभागामार्फत सुरू असलेल्या नदी-नाला खोलीकरणाच्या कामांची पाहणी करण्यात आली.

या वेळी उप आयुक्त रोहयो अमरावती विभाग नीलेश ठोंबरे, खामगाव उपविभागीय कृषी अधिकारी बाळासाहेब व्यवहारे, गटविकास अधिकारी डॉ. सुरुसे, नायब तहसीलदार एस.बी. डाबेराव, तालुका कृषी अधिकारी रामदास शिरसाठ, मंडळ कृषी अधिकारी आर. जी. देशमुख, पशुधन विकास अधिकारी पिंप्री गवळी डॉ. प्रतीक कोकाटे, सरपंच शोभा थोरात आदी उपस्थित होते.

## आत्महत्याग्रस्त कुटुंबांना योजनांचा आधार

दौऱ्यादरम्यान आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांची भेट घेऊन त्यांच्या अडचणी जाणून घेताना ॲड. हेलोंडे पाटील यांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ या कुटुंबांना प्राधान्याने मिळावा, यावर भर दिला. कृषी, पशुसंवर्धन, आरोग्य, कौशल्य विकास तसेच महिला व बालविकास विभागांच्या योजनांद्वारे कुटुंबांचे पुनर्वसन आणि आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक निर्देश देण्यात आले. शेतकरी आत्महत्यांना आळा घालण्यासाठी दीर्घकालीन आणि प्रभावी उपाययोजनांची गरज असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

**दिनांक १२.०६.२०२६ तहसिल कार्यालय, नांदूरा जि. बुलढाणा येथे तहसिलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी, पशुधन विकास अधिकारी यांच्या समवेत तालुक्यातील शेतकरी आत्महत्या व शासकीय जमिनीवर चारा लागवडसंबंधी बैठक व चर्चा**





**दिनांक १२.०६.२०२६ शेगांव, जि. बुलढाणा येथे नगरपरीषद शेगांव अंतर्गत ओला कचरा पासून विद्युत निर्मीती प्रकल्पास भेट व पाहणी**





दिनांक १७.०६.२०२६ रोजी हातोला, ता.दारव्हा, जि.यवतमाळ येथे मृतक प्रकाश भाष्कर गोरडे शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियास भेट





दिनांक १७.०६.२०२६ रोजी दारव्हा ते यवतमाळ रोडवर नाला खोलीकरणाचे ठिकाणास भेट व पाहणी





दिनांक १७.०६.२०२६ रोजी विश्रामगृह, दारव्हा येथे तहसिलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी, पशुधन विकास अधिकारी यांच्या समवेत तालुक्यातील शेतकरी आत्महत्या व शासकीय जमिनीवर चारा लागवडसंबंधी बैठक व चर्चा





दिनांक १८.०६.२०२६ रोजी भिडी, ता. देवळी, जि. वर्धा येथे मृतक रविचंद्र रामभाऊ थुल शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियास भेट





# सरकार की योजनाओं को आम लोगों तक पहुंचाएं: एड.नीलेश हेलोंडे-पाटिल

राष्ट्रवाण

## जंगलापुर में आत्महत्याग्रस्त पीड़ित परिवार से की मुलाकात और की बातचीत

**वर्धा.** स्वर्गीय वसंतराव नाइक शेती स्वावलंबन मिशन के अध्यक्ष एड. नीलेश हेलोंडे-पाटिल ने सेलू तालुका के जंगलापुर में आत्महत्या करने वाले किसान गणेश तुकाराम माहुरे के घर जाकर परिवार से बातचीत की. इसके बाद हुई बैठक में उन्होंने सरकार की योजनाओं को आम लोगों तक पहुंचाने के निर्देश दिए.



प्रशासन को लोगों को साहूकार कनून के बारे में जागरूक करने की पहल करनी चाहिए. अगर इस बारे में शिकायतें हैं, तो उन्हें लिखकर देने के लिए बढ़ावा देना चाहिए. इस मौके पर उन्होंने कृषी विभाग को बीज, खेती का सामान बांटने और सरकारी जमीन पर चारा उगाने के बारे में निर्देश दिए. डेयरी फार्मिंग को बढ़ावा देने के लिए किसानों तक सीधे पहुंचकर और उन्हें डेयरी फार्मिंग के बारे में मार्गदर्शन करके दूध देने वाले जानवर बांटने की योजना लागू की जानी चाहिए. आत्महत्या से प्रभावित परिवारों को कौशल्य विकास कार्यक्रम के जरिए कौशलपुर्ण बनाने पर जोर दिया जाना चाहिए. महिला और बाल विकास विभाग को आत्महत्या से प्रभावित परिवारों के 3 से 18 साल के छात्रों को बच्चों की देखभाल के लिए आर्थिक स्कॉलरशिप देने का निर्देश दिया गया.

इस मौके पर तहसीलदार डॉ. शकुंतला पाराजे, समाज कल्याण के विजय कामड़ी, गुटविकास अधिकारी देवानंद पानवुडे, तालुका कृषी अधिकारी श्री.माहुले, तालुका कृषी अधिकारी डॉ. राम वरठी, महिला एवं बाल विकास वी.जी. नागोसे, गुट शिक्षणाधिकारी शैलेजा शिंदे, तालुका पशुसंवर्धन अधिकारी डॉ. एम.डी. साखरे, नायब तहसीलदार के.डी. किरसान, बैंक ऑफ इंडिया के ब्रांच मैनेजर गौरव गावंडे, मंडल अधिकारी रमेश भोले, यशवंत लडके, सचिन पिसुड्डे, ग्राम महसुल अधिकारी भट, ईशा करोडदे मौजूद थे.

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शासनाच्या योजनांचा लाभ तात्काळ मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत : ॲड. निलेश हेलोंडे पाटील

## भिडी येथे आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांची घेतली प्रत्यक्ष भेट



**(योगेश कावंळे)**

**गौळ :** वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशन, महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) ॲड. श्री. निलेश हेलोंडे पाटील यांनी आज देवळी तालुक्यातील मौजा भिडी येथे भेट देऊन आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांची प्रत्यक्ष भेट घेत त्यांच्या अडी-अडचणी जाणून घेतल्या. यावेळी त्यांनी संबंधित कुटुंबांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने कार्य करण्याच्या सूचना दिल्या.

या दौऱ्यादरम्यान ॲड. हेलोंडे पाटील यांनी आत्महत्याग्रस्त शेतकरी स्व. रविचंद्र रामभाऊ थुल तसेच स्व. गौतम रावजी थूल यांच्या निवासस्थानी भेट देऊन कुटुंबीयांशी सविस्तर चर्चा केली. त्यामध्ये, स्व. रविचंद्र थूल यांच्या १८ वर्षाच्या मुलीची भेट घेतली असता असे लक्षात आले कि, तिला आईसुद्धा नाही त्यामुळे तिचे संगोपन तिची आजी करीत आहे. तसेच, ती मुलगी अपंग आहे. त्यामुळे, तिला आवश्यक असलेल्या योजनांचा लाभ देणेबाबत महिला व बालविकास अधिकारी, पं.स. देवळी यांना सूचना दिल्या. तसेच, स्व. गौतम रावजी थूल यांचे कुटुंबियांना भेट दिली त्यादरम्यान आवळून आले कि, त्यांना नऊ वर्षाचा मुलगा असून तो कुपोषित आहे, त्याला सुद्धा आवश्यक योजनांचा लाभ देणेबाबत सूचना दिल्या. दोन्ही कुटुंबाच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक अडचणींबाबत माहिती घेत त्यांच्या समस्या समजून घेतल्या. दोन्ही कुटुंबांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असल्यामुळे त्यांना घरकुल आवास योजना, उज्ज्वला योजना तसेच शासनामार्फत उपलब्ध असलेल्या विविध कल्याणकारी योजना, आर्थिक सहाय्य, कृषीविषयक सुविधा व पुनर्वसन उपाययोजनांचा लाभ संबंधित कुटुंबांना प्रभावीपणे मिळवून देण्याबाबत त्यांनी अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

यावेळी उपस्थित महसूल, कृषी व पंचायत राज विभागाच्या अधिकाऱ्यांना संबोधित करताना ॲड. हेलोंडे पाटील यांनी आत्महत्याग्रस्त कुटुंबांवर विशेष लक्ष केंद्रित करण्याचे निर्देश दिले. भिडी गावामध्ये मागील काही वर्षात आत्महत्या केलेल्या शेतकर-यांची संख्या जास्त असून अशा आत्महत्याग्रस्त कुटुंबांच्या समस्या केवळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्षात सोडविण्यासाठी समन्वयाने काम करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकरी कुटुंबांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ वेळेत मिळण्याकरिता तसेच त्यांच्या मुलांच्या शिक्षण, रोजगार व उपजीविकेच्या प्रश्नांबाबत सकारात्मक दृष्टीकोन ठेवून कार्यवाही करावी, असेही त्यांनी नमूद केले. मौजा भिडी येथे प्रथम प्राधान्याने आरोग्य विभागामार्फत आरोग्य शिबीर आयोजित करून आयुष्यमान भारत कार्ड तयार करून त्यांचे वाटप सर्व गरजू नागरिकांना करणेबाबत सूचनादिल्या. तसेच, पुढील एका महिन्यामध्ये महसूल, कृषि, पंचायत समिती, अग्रणी बँक व ईतर सर्व विभागाच्या समन्वयाने नियोजन करून भिडी येथे शिबिराचे आयोजन करून प्रत्येक विभागाशी संबंधित योजना जसे कि, कृषि विभागाने महा-डी.बी.टी. पोर्टल वर अर्ज करून घेणे, पशुधन विकास विभागाने गावे निवड करून चारा लागवड करण्याकरिता लाभ देणे, सहकार विभागाने सहकार कायद्याची प्रचार प्रसिद्धी करणे, तसेच इतर विभागांनी सुद्धा त्यांच्या योजना आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या कुटुंबांना प्राधान्याने देण्याच्या सूचना दिल्या. या प्रसंगी मौजा भिडीचे प्रशासक सचिन बिरे, तहसीलदार, देवळी समर्थ क्षीरसागर, गटविकास अधिकारी, देवळी प्रफुल लोखंडे, तालुका कृषी अधिकारी, देवळी निकेश इंगोले, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी श्रीमती तृप्ती चव्हाण, पशुधन विकास अधिकारी श्री. टी.टी. तिठे, बालविकास प्रकल्प अधिकारी श्रीमती एस. ए. चोरे तसेच विविध विभागांचे विभागप्रमुख अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्यानंतर तहसिल कार्यालय, देवळी येथे ॲड. हेलोंडे पाटील यांनी सर्व विभागप्रमुख यांची सभा घेतली. सदर सभेमध्ये तालुक्यातील शेतकरी आत्महत्या कमी करण्यासाठी शेतीसोबतच शेतीपूरक व्यवसाय करण्याकरिता प्रोत्साहन देणेबाबत सर्व विभागाच्या अधिका-यांना सूचना दिल्या. यामध्ये, चारा लागवड करणे, फळबाग लागवड, पशुपालन, दुग्धव्यवसाय, रेशिम शेती करणे, ई. शेतीपूरक व्यवसाय करणेकरिता प्रोत्साहन देणेबाबत सूचना दिल्या. तसेच, प्रत्येक महिन्याला एक शेतकरी कुटुंबाला बोलवून त्यांच्या समस्या जाणून घेणे व त्यावर आवश्यक उपाययोजना करणेबाबत सूचना देवळीचे तहसिलदार समर्थ क्षीरसागर यांना दिल्या.

सांध्य दैनिक वर्धा प्रतिमा


# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या मदतीसाठी प्रशासनाला सज्ज राहण्याचे आदेश

## ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांची भिडी गावाला भेट; शासनाच्या योजनांचा लाभ तातडीने देण्याच्या सूचना

**पियुष खोंडे (पाटील)/वर्धा,**

देवळी तालुक्यातील मौजा भिडी येथे आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या समस्या जाणून घेण्यासाठी कै.वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशन, महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी प्रत्यक्ष भेट देत कुटुंबीयांशी संवाद साधला. यावेळी शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

दौऱ्यादरम्यान ॲड. हेलोंडे पाटील यांनी स्व. रविचंद्र रामभाऊ थूल व स्व. गौतम रावजी थूल यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. स्व. रविचंद्र थूल यांच्या कुटुंबातील १८ वर्षीय अपंग मुलीचे संगोपन तिची वृद्ध



आजी करीत असल्याचे निदर्शनास आले. या मुलीला महिला व बालविकास विभागामार्फत आवश्यक लाभ तातडीने देण्याचे निर्देश देण्यात आले.



तसेच स्व. गौतम रावजी थूल यांच्या कुटुंबातील नऊ वर्षीय मुलगा कुपोषित असल्याचे आढळून आले. त्याला आवश्यक पोषण व आरोग्यविषयक योजनांचा लाभ मिळावा यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना तत्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

दोन्ही कुटुंबांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने घरकुल आवास योजना, उज्वला योजना, आर्थिक सहाय्य, कृषी सुविधा व पुनर्वसन योजनांचा लाभ प्राधान्याने देण्याबाबत प्रशासनाशी सविस्तर चर्चा करण्यात आली. आत्महत्याग्रस्त कुटुंबांच्या समस्या केवळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्षात सोडविण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश ॲड. हेलोंडे पाटील यांनी दिले.

भिडी गावात प्रथम टप्प्यात विशेष आरोग्य शिबिर आयोजित करून सर्व पात्र नागरिकांची आयुष्यमान भारत कार्डे तयार करण्यात यावीत, असे निर्देशही त्यांनी दिले. तसेच पुढील एका महिन्यात महसूल, कृषी, पंचायत समिती, पशुसंवर्धन, अग्रणी बँक व इतर विभागांच्या संयुक्त सहभागातून विशेष शिबिर आयोजित करून विविध योजनांचा लाभ गावातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे नियोजन करण्यास सांगितले.

यानंतर देवळी तहसील कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी शेतीपूरक व्यवसायांना प्रोत्साहन देण्यावर भर देण्यात आला. चारा लागवड, फळबाग, पशुपालन, दुग्धव्यवसाय, रेशीम शेती आदी व्यवसायांच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले. तसेच दरमहा एका शेतकरी कुटुंबाच्या समस्या ऐकून त्यावर उपाययोजना करण्याचे निर्देश तहसील प्रशासनाला देण्यात आले.


यावेळी तहसीलदार समर्थ क्षीरसागर, गटविकास अधिकारी प्रफुल लोखंडे, तालुका कृषी अधिकारी निकेश इंगोले, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी तृप्ती चव्हाण, पशुधन विकास अधिकारी टी. टी. तिठे, बालविकास प्रकल्प अधिकारी एस. ए. चोरे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. **कार्यकारी संपादक**

दिनांक १८.०६.२०२६ रोजी भिडी, ता. देवळी, जि. वर्धा येथे मृतक गौतम रामजी थुल शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियास भेट





**दिनांक १८.०६.२०२६ रोजी तहसिल कार्यालय, देवळी येथे तहसिलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी, पशुधन विकास अधिकारी यांच्या समवेत तालुक्यातील शेतकरी आत्महत्या व शासकीय जमिनीवर चारा लागवडसंबंधी बैठक व चर्चा**






दिनांक १८.०६.२०२६ रोजी जगलापूर, ता. सेलू, जि. वर्धा येथे मृतक गणेश तुकाराम माहुरे शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियास भेट






**दिनांक १८.०६.२०२६ रोजी तहसिल कार्यालय, सेलू येथे तहसिलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी, पशुधन विकास अधिकारी यांच्या समवेत तालुक्यातील शेतकरी आत्महत्या व शासकीय जमिनीवर चारा लागवडसंबंधी बैठक व चर्चा**






दिनांक १८.०६.२०२६ रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती, हिंगणघाट येथे बाजार समितीद्वारे शेतकरी आत्महत्याग्रस्त शेतक-यांचे कुटूंबियास पेरणी टोकणयंत्र वाटप कार्यक्रमास उपस्थित






देशोन्नती

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना मोफत बियाणे पेरणी यंत्रांचे वाटप



## देशोन्नती वृत्तसंकलन

**हिंगणघाट** : शेती व्यवसायात यांत्रिकीकरणाला चालना देण्याच्या उद्देशाने हिंगणघाट कृषि उत्पन्न बाजार समितीच्या वतीने आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना १०० टक्के अनुदानावर मोफत बियाणे पेरणी यंत्रांचे वितरण करण्यात आले. कापूस मार्केट यार्ड येथील नव्या प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात स्वालंबी मिशन, अमरावती (राज्यमंत्री दर्जा) चे अध्यक्ष ?ड. निलेश हेलोंडे पाटील यांच्या हस्ते यंत्रांचे वितरण करण्यात आले.

बाजार समिती शेतकरी हिताच्या दृष्टीने विविध योजना सातत्याने राबवत असून, वाढती मजूर टंचाई आणि मजुरीचे वाढते दर लक्षात घेऊन यावर्षी ५० टक्के अनुदानावर बियाणे पेरणी यंत्रे उपलब्ध करून देण्यात आली. यावेळी ?ड. निलेश हेलोंडे पाटील यांनी आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना ही यंत्रे १०० टक्के अनुदानावर देण्याची सूचना केली. बाजार समितीचे सभापती ?ड. सुधीर कोठारी व संचालक मंडळाने या सूचनेची तत्काळ दखल घेत अल्पावधीत या योजनेची प्रभावी अंमलबजावणी केली.

या उपक्रमांतर्गत ४२ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांसह १,१५८ इतर शेतकऱ्यांना असे एकूण १,२०० बियाणे पेरणी यंत्रांचे वाटप करण्यात आले.

प्रास्ताविकात सभापती ?ड. सुधीर कोठारी यांनी बाजार समितीच्या शेतकरीहिताच्या विविध योजना व सुविधा यांची माहिती दिली.

अध्यक्षीय भाषणात ?ड. निलेश हेलोंडे पाटील म्हणाले की, आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना मोफत पेरणी यंत्रे देण्याच्या सूचनेवर बाजार समितीने तातडीने निर्णय घेऊन प्रभावी अंमलबजावणी केली. हिंगणघाट बाजार समितीचा हा शेतकरी-केंद्रित दृष्टिकोन राज्यातील इतर बाजार समित्यांसाठीही आदर्श ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाला माजी आमदार राजूभाऊ तिमांडे, समुद्रपूर बाजार समितीचे सभापती हिम्मतराव चतुर, उपसभापती हरिष वडतकर, संचालक मधुसूदन हरणे, प्रफुल बाडे, राजेश मंगेकर, पंकज कोचर, संजय कातरे, माधुरीताई चंदनखेडे, नगरपालिकेचे बांधकाम सभापती चंदुभाऊ मावळे, नगरसेवक विनोद झाडे, नितेश नवरखेडे, विक्की वाघमारे, सुरज कुबडे, नयन निखाडे, मेहेरबाबा ग्रामीण सहकारी पतसंस्थेचे नरेंद्र थोरात, उपविभागीय अधिकारी आकाश अवतारे, तहसीलदार योगेश शिंदे, तालुका कृषी अधिकारी सचिन सुतार, देवळीचे तालुका कृषी अधिकारी निकेश इंगोले, सहाय्यक निबंधक स्वप्नील पुराम तसेच मोठ्या संख्येने शेतकरी, बाजार समितीचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**तालुका प्रतिनिधी**

पुण्य नगरी

# हिंगणघाट बाजार समितीच्या उपक्रमांचा इतर बाजार समित्यांनीही आदर्श घ्यावा : हेलोंडे पाटील

**पुण्य नगरी** / तालुका प्रतिनिधी

**हिंगणघाट :** आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना मोफत पेरणी यंत्रांचे वितरण करण्याची सूचना समितीला केली होती. समितीचे सभापती, तसेच संचालक मंडळाने त्यावर तत्काळ निर्णय घेऊन अल्पावधीत प्रभावी अंमलबजावणी केली. ही कार्यपद्धती हिंगणघाट बाजार समितीच्या शेतकरीकेंद्रित दृष्टिकोनाची साक्ष देणारी असून राज्यातील इतर बाजार समित्यांनी अशा उपक्रमांचा आदर्श घ्यावा, असे आवाहन कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष अॅड. नीलेश हेलोंडे पाटील यांनी केले.

शेती व्यवसायात यांत्रिकरणाला प्रोत्साहन देण्याच्यादृष्टीने हिंगणघाट बाजार समितीकडून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना मोफत बियाणे, पेरणी यंत्राचे वितरण अॅड. हेलोंडे पाटील यांच्या हस्ते झाले. समितीच्या नविन प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमाला बाजार समितीचे सभापती अॅड. सुधीर कोठारी, माजी आमदार राजू तिमांडे, समुद्रपूर बाजार समितीचे सभापती हिम्मत चतुर व इतर उपस्थित होते. बियाणे टोकन वितरणा संदर्भाने आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांकडून ४२ तर इतर शेतकऱ्यांकडून १,१५८, असे एकूण १,२०० अर्ज प्राप्त झाले. इतर शेतकऱ्यांना २५ मे पासून प्रत्यक्ष यंत्रांचे वितरण करण्यात आले. १७ जून पावेतो ११२६ इतर शेतकऱ्यांना तर ३४ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना टोकण यंत्राचे वितरण पूर्ण करण्यात आले होते. उर्वरित लाभार्थ्यांना १८ जून रोजी यंत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविकातून सभापती अॅड. सुधीर कोठारी यांनी बाजार समितीद्वारा शेतकरी हिताच्यादृष्टीने कार्यान्वित केलेल्या विविध योजना व उपलब्ध करून दिलेल्या सुविधांबाबत माहिती दिली. तसेच संचालक मंडळाच्या सहकार्याने गेल्या २५ वर्षांत शेतकरी केंद्रित उपक्रम राबवित समितीची वार्षिक उलाढाल सुमारे ७० कोटी रुपयांवरून २,२०० कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यात आल्याचे नमूद केले.




कार्यक्रमाला उपसभापती हरीश वडतकर, संचालक मधुसूदन हरणे, प्रफुल्ल बाडे, राजेश मंगेकर, पंकज कोचर, संजय कातरे, माधुरी चंदनखेडे, सभापती चंदू मावळे, नगरसेवक विनोद झाडे, नीतेश नवरखेडे आदी उपस्थित होते.

दिनांक १९.०६.२०२६ रोजी नरखेड, जि. नागपूर येथे नाला खोलीकरणाचे ठिकाणास भेट व पाहणी




**दिनांक २४.०६.२०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे कार्यालयात कार्यालयीन कामकाज**



**दिनांक २५.०६.२०२६ रोजी तहसिल कार्यालय, पैठण येथे तहसिलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी, पशुधन विकास अधिकारी यांच्या समवेत तालुक्यातील शेतकरी आत्महत्या व शासकीय जमिनीवर चारा लागवडसंबंधी बैठक व चर्चा**





**दिनांक २५.०६.२०२६ रोजी पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर येथे महाराष्ट्र वस्त्रोद्योग महामंडळाचे पैठणी साडी विणकाम प्रशिक्षण केंद्रास भेट व पाहणी**





दिनांक २७.०६.२०२६ रोजी खंडाळा, ता. नरखेड, जि. नागपूर येथे पशुसंवर्धन विभाग, नरखेड यांच्या वतीने आयोजीत पशुपालक शेतक-यांना चारा बियाणे वाटप व जनावरांचे लसीकरण कार्यक्रमास उपस्थित




ग्रामपंचायत



दिनांक २९.०६.२०२६ रोजी नागपूर येथे महाराष्ट्र बँक रोजगार प्रशिक्षण संस्था, नागपूर द्वारा आयोजीत रोजगार प्रशिक्षण वर्गास भेट व कार्यक्रमास उपस्थित



